कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोट, जि.अकोला यांच्याशी संबंधित गैरव्यवहाराची तपासणी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: लवेसू २०२५/प्र.क्र.२१३/११-स**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०२६

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ च्या द्वितीय अधिवेशनामध्ये दि.०९.०७.२०२५ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्र. ४८३ उपस्थित झाली होती. सदर लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोट जि.अकोला येथील सुरू असलेल्या विविध चौकश्या विहित कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येतील, तसेच नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी, अकोट व खरेदी विक्री सहकारी संघ, अकोट यांनी पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ज्वारी खरेदी करताना अनियमितता आढळून आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन मा.मंत्री (पणन) यांनी दिले आहे.

तसेच कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोट जि. अकोला येथील कार्यरत संचालक मंडळाच्या कार्यपद्धतीबाबत, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्याकडून सुरु असलेल्या चौकशीला झालेला विलंब व ज्वारी खरेदी प्रकरणी शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यामध्ये हेतुपूर्वक फेरफार करुन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. त्याकरिता विभागाकडून SIT (Special Investigation Team) नियुक्त करुन चौकशी करण्यात येईल असे आश्वासन मा. मंत्री महोदयांनी दिले आहे.

मा.मंत्री (पणन) महोदयांनी दिलेल्या आश्वासनांनुसार खरेदी संस्थांनी किंवा व्यक्तींनी खरेदी प्रक्रियेत अनियमितता केली आहे किंवा कसे, त्यांच्याकडून Criminal Misconduct, Forgery तसेच संगनमताने गुन्हा केला आहे किंवा कसे, तसेच शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे किंवा कसे, या बाबी तपासण्यासाठी एक विशेष तपास पथक (Special Investigation Team- SIT) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२५ च्या द्वितीय अधिवेशनामध्ये विधानपरिषद सभागृहात उपस्थित झालेल्या लक्षवेधी क्र.४८३ च्या चर्चेदरम्यान मा.मंत्री (पणन) यांनी दिलेल्या आश्वासनानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती, अकोट, जि.अकोला यांच्याशी संबंधित गैरव्यवहाराबाबत तपासणी करण्याकरिता खालीलप्रमाणे विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात येत आहे.

१) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे - अध्यक्ष.

२) जिल्हा पोलीस अधीक्षक, अकोला - सदस्य

३) जिल्हा विशेष लेखापरिक्षक अधिकारी (वर्ग-१), अमरावती - सदस्य सचिव.

२. सदर विशेष तपास पथकाची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल :-

१) अर्जदार श्री. विनायक सरनाईक यांनी शासनाकडे सादर केलेल्या दि.०३.०१.२०२५ व दि.१२.०६.२०२४ रोजीच्या तक्रार अर्जावर व अर्जदार श्री. गजानन पुंडकर यांनी शासनाकडे दि.२५.०५.२०२४ रोजी केलेल्या व शासनाकडे दि.०३.०७.२०२४ रोजी प्राप्त झालेल्या तक्रार अर्जावर क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झाल्यापासून केलेल्या कार्यवाहीची तपासणी करणे.

२) सदर प्रकरणी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ तसेच संबंधित अधिनियमातील तरतुदींनुसार व नियमानुसार चौकशी करताना विहित कार्यपद्धती अवलंबली आहे किंवा कसे, तसेच, विहित कार्यपद्धतीचा अवलंब करण्यास विलंब झाले आहे किंवा कसे, ही बाब तपासणे.

३) सदर प्रकरणी कापूस खरेदी प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन फौजदारी गुन्हे दाखल करणे.

४) नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी, अकोट व खरेदी विक्री सहकारी संघ, अकोट यांनी पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ज्वारी खरेदी करताना संबंधित सहकारी संस्थेकडून शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यात फेरफार झाला आहे किंवा कसे, ही बाब तपासणे व फेरफार झाला असल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे.

५) कृषि उत्पन्न बाजार समिती अकोट, जि. अकोला यांचे विभाजन करुन नवीन चौहोट्टा बाजार समिती निर्माण करण्याबाबत सदर बाजार समितीची Financial Feasibility तपासणे.

**३.** उपरोक्त छानननी व पडताळणी करण्याकरिता गठित विशेष तपास पथकास शासनाकडून विशेषाधिकार प्रदान करण्यात येत असून, त्यांना तपासाकरिता जिल्हा विशेष लेखापरिक्षक अधिकारी (वर्ग १), अमरावती या कार्यालयातील आवश्यक कर्मचारीवृंद उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४.** उपरोक्त विशेष तपासणी पथक शासनास अंतिम अहवाल ९० दिवसांत सादर करेल.

**५.** सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३०२१६५५५२८६०२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAVI SANDEEP SHINDE

Digitally signed by MADHAVI SANDEEP SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=020531E249E88FE74BF6DB805F42944E7F29BC0BA6134C83C1F183B8CC27F2FF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4CB1CBBD6A4EE442FDAA6C1B358BF61FEAF9AEFC16E8F39E9EE1D06B9E8A7A59, cn=MADHAVI SANDEEP SHINDE
Date: 2026.03.02 16:56:43 +05'30'

**( माधवी शिंदे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
२. मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव.
३. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे
७. जिल्हाधिकारी तथा दंडधिकारी, जि. अकोला
८. जिल्हा पोलीस अधीक्षक, अकोला
९. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.विभागिय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती.
११.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला
१२.जिल्हा विशेष लेखापरिक्षक अधिकारी (वर्ग १), अमरावती
१३.सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोट
१४.निवडनस्ती- ११-स.